| | PRESS CLIPPING | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision [2nd day] | | | | |
| Publication | Deshonnati | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 13/11/16 |

देशोन्नती नागपूर, रविवार, दि. १३ नोव्हेंबर २०१६

# विमानतळाजवळ कृषी केंद्रामुळे गुजरातमध्ये वाढली निर्यात

## मुख्यमंत्री विजयभाई रूपानी यांचे प्रतिपादन

## शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट वाढविण्याला विशेष प्रोत्साहन

## कृषी विकासदर १७ टक्क्यांपेक्षा जास्त

प्रतिनिधी / १२ नोव्हेंबर

**नागपूर :** शेती ते विदेशी बाजारपेठ ही संकल्पना शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कृषी माल जागतिक बाजारपेठेत पाठविण्यासाठी विमानतळाशेजारीच कृषी निर्यात केंद्र सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे गुजरातमधून मोठ्या प्रमाणात निर्यात वाढली, असे प्रतिपादन गुजरातचे मुख्यमंत्री विजयभाई रूपानी यांनी केले.

रेशीमबाग मैदानावर मध्य भारतातील सर्वात मोठ्या 'ॲग्रो व्हिजन' या कृषी प्रदर्शनामध्ये कार्यशाळेचे उद्घाटन विजयभाई रूपानी यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी होते. प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय लघु व मध्यम राज्यमंत्री गिरीराज सिंह, सामजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, कृषी विभागाचे प्रधान सचिव विजय कुमार, कृषक किसान सेलचे अजय विर जाखड, टी. नंदा, सोढी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना कृषी उत्पादनाला योग्य भाव मिळावा यासाठी गुजरात सरकारतर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमाविषयी सांगताना मुख्यमंत्री विजयभाई रूपानी म्हणाले की, शेतकऱ्यांना पीक विमा संरक्षणाच्या माध्यमातून ११ हजार कोटी रुपयांचे विमा संरक्षण मिळाले असून कृषी कर्ज १८ टक्केऐवजी १ टक्के व्याजदराने उपलब्ध करून दिल्यामुळे उत्पादन खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या योजनेचा ३८ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला. दोन लाख मेट्रीक टनावरून २२ लाख मेट्रीक टन्न उत्पादनात वाढ झाली असताना १ लाख ११ हजार कोटी रुपयांचे उत्पादनात वाढ झाल्यामुळेच कृषी विकासाचा दर १७ टक्क्यांपर्यंत वाढला असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना शेतातच ई-गाव व ई-पोर्टलच्या माध्यमातून जगातील सर्व कृषी उत्पादनाचे भाव उपलब्ध होत असल्याचे गुजरातचे मुख्यमंत्री म्हणाले की, ॲग्रो व्हिजन या कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी अत्यंत उपयुक्त असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सुरू केलेल्या बायोटेक्नॉलॉजी व मिथेनॉल निर्मितीचे तंत्रज्ञानाचा प्रयोग गुजरातमध्येही राबविण्यात येईल असे म्हणाले.




अध्यक्षीय भाषणात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गुजरात राज्याने कृषी क्षेत्रात राबविलेल्या विविध योजना तसेच दूध उत्पादन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करताना गुजरातप्रमाणेच महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद आदी विमानतळाजवळ ५ एकर जमिनीवर शेतकऱ्यांसाठी निर्यात सुविधा प्रकल्प सुरू करण्याची गरज बोलून दाखविली. एनडीडीबीच्या माध्यमातून विदर्भ व मराठवाड्यामध्ये दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. दुधाचे उत्पादन वाढविण्याचे आवाहन शेतकऱ्यांनी स्वीकारावे व ही अर्थव्यस्था ५० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा संकल्प व्यक्त केला.

महाराष्ट्रात सर्वात कमी म्हणजे केवळ १८ टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. येत्या अडीच वर्षात ती साठ टक्के वाढविण्यासाठी नियोजनबध्द आराखडा तयार करून यासाठी केंद्रीय निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असून प्रत्येक कृषी पंपांना वीज कनेक्शन देण्याचे महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाची प्रशंसा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून शाश्वत सिंचनाला गती दिली आहे. तसेच ठिबक सिंचनासाठी योजना तयार करण्याच्या घोषणेच त्यांनी स्वागत केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री गिरीराज सिंह, ॲग्रो व्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी यांनी ॲग्रो व्हिजनच्या माध्यमातून प्रगत तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणार आहे. कमी पाण्यात जास्त उत्पादन घेणारे तंत्रज्ञान आत्मसात करावे तसेच शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे आवाहन केले. यावेळी कृषी कल्याणच्या ऊस या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रेणुका देशकर यांनी तर आभार रवि बोरटकर यांनी मानले.